**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

डॉ.रविंद्र रूपगिर गिरीभाई
समर्थ हॉस्पिटल, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८४+१२६४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे प्रतिनिधी श्रीमती सु.अ.भावसार

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे प्रतिनिधी श्री.के.बी.हजारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.५.२००७ व ५.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.६.०७ व १३.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.८.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे दि.१७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता डॉ.रविंद्र रूपगिर गिरीभाई यांनी कार्यालयात समक्ष येऊन नकला प्राप्त करून घ्याव्यात, असे पत्र त्यांना पाठविले. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगरभूमापन शिरस्तेदार, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, जुन्नर, जि.पुणे श्री.यू.एम.हिले हे सेवानिवृत्त झाल्याने व माहिती तयार करणारा कर्मचारी स्वतःच्या लग्नासाठी रजेवर असल्याने माहिती देण्यासाठी जादा एक महिन्याची मुदत द्यावी, असे विनंतीपत्र डॉ.गिरी यांना दिले होते. परंतु त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख, पुणे यांच्याकडे अपील केले. विहित शुल्क आकारून सात दिवसांत माहिती पुरविण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख, पुणे श्री.गि.ह.राव यांनी दिले. त्यानुसार शुल्क कळविले, परंतु त्यानी शुल्क भरून माहिती प्राप्त करून घेतली नाही, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जुन्नर, जि.पुणे यांचे प्रतिनिधी श्री.के.बी.हजारे यांनी सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाश पुरूषोत्तम गिरी
मु.झाडगाव, पो.विडूळ, ता.उमरखेड, जि.यवतमाळ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे प्रतिनिधी श्रीमती सु.अ.भावसार

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे प्रतिनिधी श्री.के.बी.हजारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.११.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे दि.१७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.सुभाष पुरूषोत्तम गिरी यांनी मागितलेली माहिती पाच वर्षांच्या काळातील असून तत्कालीन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगरभूमापन शिरस्तेदार, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, जुन्नर, जि.पुणे श्री.यू.एम.हिले हे सेवानिवृत्त झाल्याने व माहिती तयार करणारा कर्मचारी स्वतःच्या लग्नासाठी रजेवर असल्याने माहिती देण्यासाठी जादा एक महिन्याची मुदत द्यावी असे विनंतीपत्र डॉ.गिरी यांना दिले होते. परंतु त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांच्याकडे अपील केले. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.गिरीश राव यांनी अपीलकर्त्यास दि.५.१२.२००७ पर्यंत माहिती निःशुल्क पुरविण्याचा आदेश दिला. दि.१२.१२.२००७ रोजी रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविण्यात आली, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जुन्नर, जि.पुणे यांचे प्रतिनिधी श्री.के.बी.हजारे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांच्या प्रतिनिधी श्रीमती सु.अ.भावसार यांनी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३०.११ २००९**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, महाराष्ट्र

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

ॲड. राम भागवत नीळ — अपीलकर्ता
मु.निमगाव (ह), पो.कोळगाव, ता.करामाळा, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भू संपादन अधिकारी क्र.४, करमाळा,
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.११.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर तर्फे प्रतिनिधी श्रीमती एम.व्ही. गायकवाड<br>**जन माहिती अधिकारी तथा** विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.४, करमाळा, जि. सोलापूर तर्फे प्रतिनिधी श्री. आर.सी.कोळी | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.११.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता ॲड. राम भागवत नीळ यांनी मागितलेली माहिती अन्य कार्यासनांकडून मिळवून द्यावयाची असल्यामुळे विलंब लागला. सिना कोळेगांव प्रकल्पाकडील प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत, त्यामुळे देता आले नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.४, करमाळा, जि. सोलापूर यांनी नमूद केले. माहिती अन्य कार्यासनांकडून प्राप्त करून द्यावयाची असल्यामुळे दोन महिन्यांचा अवधी लागेल, असे अपीलकर्त्यास कळविले होते. त्यानुसार दोन महिन्यांत माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या प्रतिनिधी श्रीमती एस.व्ही. गायकवाड यांनी केले. माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबतचा अहवाल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.४ (करमाळा), सोलापूर श्री. सुनील माडकर यांनी दि. २.१२.२००८ च्या पत्रान्वये सादर केला, तो मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. संपत पांडुरंग आबदार
'अवधूत', जयभवानी कॉलनी,
रिंगरोड, फुलेवाडी, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.३.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.४.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. अपील केले नाही |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - रस्त्यांच्या कामाबाबत व अनुदानाबाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. संपत पांडुरंग आबदार यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग कोल्हापूर यांच्याकडे रस्त्याच्या कामाबाबत व अनुदानाबाबत एकूण सहा मुद्दयांची माहिती मागितली आहे. श्री. आबदार यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.४.२००७ रोजी पत्रांन्वये माहिती दिली आहे. दिलेली माहिती खोटी व विसंगत असल्याच्या कारणावरुन श्री. आबदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ कोल्हापूर यांनी सादर केलेल्या अहवालावरुन अपीलकर्ता श्री. आबदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील

तरतूदीनुसार अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अपील न करता आयोगाकडे अपील केले आहे. त्यामुळे अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२७-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत शंकर खाडिलकर
१३०४/१/८, शुक्रवार पेठ, बाजीराव रोड, टेलीफोनजवळ, पुणे-२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सुरेश जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सतीश भोसेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्याला चुकीची माहिती दिली व घराच्या दुरूस्तीविषयक तक्रारीबाबत महानगरपालिकेने तपासणी करून घेऊन दुरूस्त्या करण्याबाबत काही कळविले नाही, अशा कारणावरून अपीलकर्ता श्री.वसंत शकर खाडिलकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.खाडिलकर यांना सर्व माहिती देण्यात आली आहे. अन्य पत्रव्यवहारातील संदर्भ देऊन माहितीबाबतची तक्रार ते करीत आहेत. जन माहिती अधिकाऱ्यांनी न दिलेल्या उत्तरात ते गृहीत धरता येणार नाही. तसेच 'कारवाई कधी करणार' यासारखे मुद्दे राज्य माहिती आयोगाकडील अपिलात त्यांनी उपस्थित केले आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.सतीश भोसेकर व अपिलीय प्राधिकारी श्री.सुरेश जगताप यांनी पूरक कागदपत्रासह केले. ते रास्त आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१९.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. रघुनाथ भगवान इंजे — अपीलकर्ता
मु. पो. निढळ, ता. खटाव, जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. रघुनाथ भगवान इंजे, मु. पो. निढळ, ता. खटाव, जि. सातारा<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर जिल्हाधिकारी, सातारा श्री. व्ही.एन.देशमाने<br>**जन माहिती अधिकारी तथा** उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण, ता. फलटण, जि. सातारा श्रीमती रेश्मा माळी | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.१०.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

सन १९३१ च्या फेरफारामध्ये दुरुस्ती करण्याबाबत आपण दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची योग्य माहिती दिली नाही. मंडल अधिकाऱ्याकडील जाबजबाबाच्या व चौकशी

अहवालाच्या नकला अद्याप दिलेल्या नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रघुनाथ भगवान इंजे यांनी केली.

श्री. इंजे यांच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर दिले. सन २००३ या अहवालाची प्रत ते मागत असले तरी अशा प्रकारचा अहवाल नसल्यामुळे सन २००६ च्या अहवालाची प्रत त्यांना दिली आहे. तसेच माहिती-मागणीच्या मूळ अर्जात श्री. इंजे यांनी अहवालाच्या प्रतींची मागणी केलेली नव्हती. फेरफारात दुरूस्तीबाबतच्या कार्यवाहीची, तसेच अशा दुरूस्तीसाठी त्यांनी कोणती प्रक्रिया अवलंबिली आहे, याचीही माहिती त्यांना देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण श्रीमती रेश्मा माळी यांनी केले. ते योग्य असल्याचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांनी केले.

श्री. इंजे यांनी मूळ अर्जात मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. फेरफाराच्या दुरूस्तीची त्यांची मागणी का मान्य करता येणार नाही व त्याबाबत त्यांनी कोणती प्रक्रिया अवलंबिणे आवश्यक आहे याची माहितीही जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण यांनी दिली आहे. सन २००३ च्या अहवालाचा उल्लेख श्री. इंजे यांनी केला असून त्याबाबत शोध घेऊन पंधरा दिवसांत जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. इंजे यांच्याशी चर्चा करून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती दिल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी श्रीमती रेश्मा माळी यांनी दि. २४.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. परंतु आपल्याला अपेक्षित असलेल्या अहवालाची प्रत मिळाली नसल्याची तक्रार श्री. इंजे यांनी दि. १२.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. तथापि जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण यांनी सादर केलेल्या अहवालात या बाबीचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २७.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे १

श्री. दत्तात्रय लक्ष्मण उभेदळ
फ्लॅट नं.२०, बालाजी दर्शन बिल्डिंग,
बालाजीनगर, धनकवडी, पुणे-४३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव,
शिक्षण प्रसारक मंडळी, शारदा सभागृह,
स.प. महाविद्यालय आवार, पुणे-३०

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा प्रबंधक,
शिक्षण प्रसारक मंडळी, शारदा सभागृह,
स.प. महाविद्यालय आवार, पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४२ / पुणे |
| २ | सनावणीची तारीख | दि. १७.२.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी**<br>शिक्षण प्रसारक मंडळी, शारदा सभागृह,<br>स.प. महाविद्यालय आवार, पुणे-३० श्री. सुजित मंगलोरकर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या संस्थेतील शिक्षण सेवक भरतीबाबतची माहिती संस्थेने नाकारली. या नोकरभरतीमध्ये अनेक गैरप्रकार झालेले असल्यामुळे ही माहिती मिळणे आवश्यक आहे, असे अपीलकर्ता श्री. दत्तात्रय लक्ष्मण उभेदळ यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील - अर्जात व लेखी निवेदनात म्हटले आहे.

श्री. उभेदळ यांनी सन २००६ ते २००८ या काळातील विस्तृत माहिती मागितली असून ती संकलित करुन देण्याची माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये तरतूद नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत तरतुदी लक्षात घेता शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही, असे उत्तर संस्थेचे सचिव डॉ.जी.के.शिरुडे यांनी श्री. उभेदळ यांना पाठविले. त्याविरुध्द प्रथम अपील न करता श्री. उभेदळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले.

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या संस्थेला शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य मिळत नाही, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असी संस्थेची भूमिका आहे. तसेच याच माहितीच्या संदर्भात धर्मादाय आयुक्तांकडे दाखल असलेल्या प्रकरणात सविस्तर उत्तर दिलेले आहे. श्री. दत्तात्रय लक्ष्मण उभेदळ यांनी मागितलेली माहिती विस्तृत असल्यामुळे दिलेली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी, शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे श्री. सुनिल मंगलोरकर यांनी केले.

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालये असून त्यांना शासनाकडून अनुदान व सवलती मिळतात. त्या त्या महाविद्यालयाच्या व शाळेच्या नावाने अनुदान मिळते. संस्थेच्या नावाने मिळत नाही, म्हणून संस्थेला शासकीय अनुदान मिळत नाही, हा शाब्दिक श्लेष मान्य करता येणार नाही. अनुदान न मिळाल्यास संस्थेचे शैक्षणिक कार्य चालू शकणार नाही, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. या स्थितीत संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो. विस्तृत माहिती मागितली असल्यास अभिलेखाचे अवलोकन करु देण्याचा मार्ग जन माहिती अधिकारी अवलंबू शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३ .११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. प्रशांत अंकुश कसबे
मु. पो. मालिकपेठ,
ता. मोहोळ,जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती, मोहोळ,
जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
ग्रामसेवक, ग्रामपंचायत मालिकपेठ,
ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२००९ (वि. अ.नि.का.) |
| ३ | **उपस्थिती :-**<br>**अपीलकर्ता :-** श्री. प्रशांत अंकुश कसबे<br>मु. पो. मालिकपेठ, ता. मोहोळ,जि. सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा:-** विस्तार अधिकारी (प.),<br>पंचायत समिती, मोहोळ, जि. सोलापूर<br>श्री. एच. ए. गायकवाड<br><br>**जन माहिती अधिकारी तथा :-** ग्रामसेवक, ग्रामपंचायत मालिकपेठ,<br>ता. मोहोळ, जि. सोलापूर<br>श्री. बी. एस. शिंदे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.१०.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अभय घटकांमध्ये १० दिवसांत माहिती देण्याबाबत एकमत झाले. तथापि माहिती १० दिवसांत प्राप्त न झाल्याची तक्रार अपीलकर्ते श्री. प्रशांत कसबे यांनी दि. ३०.४.२००९ रोजी आयोगाकडे केली. या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने दि. २८.८.२००९ रोजी जन माहिती अधकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मालिकपेठ व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, मोहोळ यांच्याकडून खुलासा मागविला. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. टी. एस. शिंदे यांनी दि. ९.९.२००९ रोजी पूरक कागदपत्रांसह खुलासा सादर केला आहे. तो विचारात घेता श्री. कसबे यांना दि. २२.५.२००९ रोजीच्या पत्रान्वये व आयोगामार्फत दूरध्वनी वरून केलेल्या विचारणेनंतर पुन्हा दि.२८.७.२००९ रोजी माहिती दिल्याचे दिसते. श्री. कसबे यांनी केलेल्या मूळ विषयातील तक्रारीवर कार्यवाही करून कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन माहिती द्यावयाची असल्यामुळे विलंब झाला, हे ग्रामसेवक श्री. टी. एस. शिंदे यांचे निवेदन मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. अच्यूत कृष्ण जातेगावकर (कुलकर्णी) अपीलकर्ता
जातेगाव खुर्द, ता. शिरूर, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप विभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, मावळ जि. पुणे श्री. संजयसिंह चव्हाण उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार, उप विभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, मावळ यांचे कार्यालय

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.२.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** उप विभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, मावळ जि. पुणे श्री. संजयसिंह चव्हाण<br>**जन माहिती अधिकारी तथा** शिरस्तेदार, उप विभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, मावळ यांचे कार्यालय श्री. व्ही.एन. थोरात | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.८.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

एप्रिल १९८८ मधील जमीन विक्री परवानगी प्रकरणातील माहिती अपीलकर्ता श्री. अच्युत कृष्ण जातेगावकर (कुलकर्णी) यांनी मागितली होती. त्यांनी अर्जात तारीख व फेरफार क्रमांक दिलेले

नव्हते. तसेच सन १९८८ ला शिरूर तालुका खेड उपविभागात होता. १९९१ मध्ये तो मावळ विभागात आला. श्री. जातेगावकर यांनी मागितलेले आदेश वर्ग केलेल्या कागदपत्रात आढळून आलेले नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, मावळ यांचे कार्यालय श्री. व्ही.एन.थोरात यांनी केले.

संबंधित कागदपत्र ब वर्गातील असून फेरफारातील आदेशाचा क्रमांक व तारीख मिळाल्यास शोध घेण्यासाठी एक महिन्याची मुदत मिळावी, अशी विनंती अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, मावळ श्री. संजयसिंह चव्हाण यांनी केली. आयोगाने ती मान्य केली.

संबंधित प्रकरणात कुळ कायदा ८४-क अंतर्गत फेरचौकशी कामी कारवाई सुरु करण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार यांनी दि. २२.१२.२००८ च्या पत्रान्वये श्री. जातेगावकर यांना कळविले. संबंधित परवानगीची संचिका अभिलेख कक्षामध्ये आढळून आलेली नाही, तथापि श्री.जातेगावकर यांनी फेरफार चुकीचा असल्याचे पुराव्यानिशी निदर्शनास आणल्यास संबंधित फेरफार पुनर्विलोकन करण्याची कार्यवाही करण्यात येईल, असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मावळ विभाग, मावळ श्री. संजयसिंह चव्हाण यांनी आयोगाने विचारणा केल्यानंतर दि. २६.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये सादर केला. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडील प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दोन तारखांना, तसेच आयोगाने आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमाच्या वेळी व आयोगापुढील सुनावणीलाही अपीलकर्ता गैरहजर असल्याचे त्यांनी या अहवालात नमूद केले आहे. नमूद मुदतीत अहवाल सादर न केल्याबद्दल अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मावळ विभाग, मावळ श्री. संजयसिंह चव्हाण यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. गोपाळ बळवंतराव राऊत
११४०, शनिवार पेठ, सातारा, **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
कराड, जि. सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथ** माहिती अधिकारी,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड,
जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८५ /२००९/ सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.१.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.२.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.६.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.७.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** विद्यापीठाच्या अधिनियमानुसार परिक्षा कालावधीबाबतची सन २००५ ते २००८ मधील माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. गोपाळ बळवंतराव राऊत यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे

आवश्यक आहे. तसेच सदरचे अपील हे मुदतबाह्य आहे. त्यामुळे या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ :- पुणे
दि.२३-११-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री.विठ्ठल हनुमंत कुऱ्हाडे
भोसरी पॉवर हाऊस, बालाजीनगर,
टेल्को रोड, भोसरी, पुणे - २६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीदार,
तहसीलदार कार्यालय दौंड, ता. दौंड, जि. पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय दौंड, ता. दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८७ / २००९ |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.५.२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.६.२००७ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - दौंड तालुक्यातील सरकारी गायरान जमिनीचे सात बारा उतारे व एकूण क्षेत्राचा तपशील इ. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विठ्ठल हनुमंत कुऱ्हाडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलाचा समावेश आयोगाने दि. २६.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त होता.

आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याने आता काही एक तक्रार नाही, असे अपीलकर्ता श्री. कुऱ्हाडे यांनी दि. १०.११.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, दौंड यांना कळविले होते. सदर पत्राची प्रत दि. २५.५.२००९ रोजीच्या पत्रासोबत अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, दौंड यांनी आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ :- पुणे**
**दि.२६-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.अजित कोंडीबा भिलारे
घ. नं. १६-०१, चिमणपूरा पेठ, सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** व्यवस्थापक,
श्री लक्ष्मी नागरी सहकारी बँक, संगमनगर, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३०५ / २००९ / सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.३.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.५.२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.६.२००६ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br>कॅशस्क्रोल व प्रोसीडिंग बुकाच्या सन २००५ ते २००९ पर्यंतच्या प्रती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.अजित कोंडीबा भिलारे यांनी जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक श्री लक्ष्मी नागरी सहकारी बँक, संगमनगर, सातारा यांच्याकडे श्री लक्ष्मी नागरी सहकारी बँकेच्या कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. माहितीचाअधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांना लागू नाही,

असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५६६६/२००७ मध्ये दिला आहे. त्यानुसार सदर अपील दखल घेण्यायोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

स्थळ :- पुणे
दि. २३ -११ -२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. शामसुंदर बैजनाथ खत्री
रो. हाऊस नं. १६, वाघोलीकर पार्क,
अशोकनगर, बारामती, जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रादेशिक सह संचालक (साखर),
पुणे विभाग, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** प्र. कार्यकारी संचालक,
दि माळेगाव सहकारी साखर कारखाना लि. शिवनगर,
ता. बारामती जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३१८ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.६.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.६.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.७.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.८.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** माहिती-मागणी मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दिनांक २१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमात' या अपिलाचा समावेश होता

आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नाही, असे निवेदन अपीलकर्ता श्री. खत्री यांनी दिनांक २०.१०.२००८ रोजी आयोगास पाठविले त्याची प्रत जन माहिती अधिकारी तथा प्र. कार्यकारी संचालक,

दि माळेगाव सहकारी साखर कारखाना लि. शिवनगर, यांनी दि. २०.१०.२००८ रोजीच्या पत्रासोबत आयोगास सादर केली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. राजेश बाबुराव दारवटकर
४५, ससून रोड, वाडीया कॉलेज समोर,
पुणे - १

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विशेष कार्य अधिकारी,
भूमिप्रापण कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे - ५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक अभियंता,
भूमिप्रापण कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे - ५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३२ / २००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.०८.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.०९.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ०८.०९.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - सन १९७७ ते १९८५ या कालावधीत बंगला नं. ४५, वाडीया कॉलेज, पुणे समोरील रस्त्यांचे रुंदीकरण करते वेळी श्रीमती सुंदरबाई भाऊसाहेब दारवटकर यांना पाठविलेल्य नोटरीच्या छाया प्रती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. राजेश बाबुराव दारवटकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील पाहता अपीलकर्त्याने अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केल्यानंतर माहितीचा अधिकार

अधिनियम, २००५ मधील कलम ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित मुदतीनंतर (३० दिवस + १५ दिवस) आयोगाकडे अपील करणे आवश्यक आहे.

अपीलकर्ता श्री. दारवटकर यांनी विहित मुदती अगोदर अपील आयोगास सादर केले आहे.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ :- पुणे**
**दि.१७-११ -२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. सोपान जगन्नाथ भोंडवे
मु.पो. भोंडवेवाडी, ता. बारामती, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे-१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
चासकमान प्रकल्प विभाग, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे-१ श्री. राजन र. शहा

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
चासकमान प्रकल्प विभाग, पुणे-१ श्री. वि.ब. कोटेचा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.१२.२००६ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १९.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता यांच्या मागणीनुसार माहितीसाठी शुल्क रु. ४३५०/- भरण्याबाबत त्यांना एक आठवड्यात कळविण्यात आले. ते त्यांनी भरले नाही. त्यामुळे अर्ज दप्तरी दाखल करण्यात आल्याचे त्यांना कळविण्यात आले. माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी अपील केले. दोन तारखा देऊनही ते सुनावणीला उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे अपील फेटाळण्यात आले. शुल्क भरल्यास माहिती देता येईल, असे लेखी व तोंडी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे श्री. राजन र. शहा यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

पुणे
दि. २७.११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १९.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता यांच्या मागणीनुसार माहितीसाठी शुल्क रु. ४३५०/- भरण्याबाबत त्यांना एक आठवड्यात कळविण्यात आले. ते त्यांनी भरले नाही. त्यामुळे अर्ज दप्तरी दाखल करण्यात आल्याचे त्यांना कळविण्यात आले. माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी अपील केले. दोन तारखा देऊनही ते सुनावणीला उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे अपील फेटाळण्यात आले. शुल्क भरल्यास माहिती देता येईल, असे लेखी व तोंडी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे श्री. राजन र. शहा यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**पुणे**
**दि. २७.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**